रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ६५
www.ramprahar.com
◆ सोमवार, २१ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
पनवेलमध्ये तब्बल ८०० किलो गोमांस जप्त; दोघे गजाआड/२
मुरूडमध्ये वाहून आलेल्या गणेशमूर्तींचे पुन्हा विसर्जन/५
गणेशोत्सव दर्शन छायाचित्रे/६,८

## राहुल गांधींनी स्टँडअप कॉमेडियनचे काम करावे; मुख्यमंत्र्यांचा टोला



**नागपूर :** मध्य प्रदेशातील इंदौर येथे काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या उपस्थितीत झालेल्या 'छात्रों की गूंज' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मिमिक्री करण्यात आली होती. या प्रकारावरून भाजप नेत्यांकडून राहुल गांधींवर टीका होत असतानाच आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या मुद्द्यावरून राहुल यांनी राजकारणाऐवजी स्टँडअप कॉमेडीमध्ये करिअर करावे. ते केल्यास त्यांना चांगला रोजगार मिळेल. इथे तर त्यांनी त्यांच्या पक्षाला बेरोजगार करून ठेवले आहे, असा टोला लगावला. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी "कासव चालत राहतो, कोणी दगड मारला की कवचात जातो. वरून दगड लागत राहतो, पण होत काही नाही, मात्र दगड मारणे थांबले की पुन्हा चालत राहायचे. अर्थात चाल कासवाची नाही, चालीत वेग आहे, पण प्रेरणा कासवच आहे," असे सांगत मी कामावर लक्ष केंद्रित करतो, असे म्हटले.

# एसटीच्या ताफ्यात अत्याधुनिक व्होल्वो बसेस

## प्रवाशांना लवकरच घडणार आरामदायी आणि दर्जेदार प्रवास

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत सर्वसामान्यांची विश्वासार्ह लोकवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाने आता लांब पल्ल्याच्या आरामदायी प्रवासाच्या क्षेत्रातही नवी झेप घेण्याची तयारी केली आहे. खासगी आराम बससेवांकडे वळणाऱ्या प्रवाशांना एसटीकडे आकर्षित करण्यासाठी लवकरच महामंडळाच्या ताफ्यात स्वमालकीच्या २०० अत्याधुनिक, वातानुकूलित व्होल्वो बसेस दाखल करण्यात येणार आहेत. सुरक्षितता, आरामदायीपणा, आधुनिक तंत्रज्ञान आणि दर्जेदार प्रवासी सेवेचा संगम या नव्या सेवेत पाहायला मिळणार आहे.

याबद्दल माहिती देताना राज्याचे परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक म्हणाले की, लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सध्या अनेक प्रवासी अधिक भाडे देऊन खासगी आराम बससेवेला पसंती देतात. वातानुकूलित सुविधा, आरामदायी आसनव्यवस्था, कमी प्रवास वेळ आणि रात्रीच्या प्रवासातील सुविधा यामुळे खासगी आराम बससेवेचा स्वतंत्र प्रवासी वर्ग निर्माण झाला आहे. या प्रवाशांना एसटीकडे आकर्षित करण्यासाठी केवळ पर्याय उपलब्ध करून न देता खासगी आराम बससेवेच्या तोडीची आधुनिक, विश्वासार्ह आणि प्रवाशांच्या अपेक्षा पूर्ण करणारी सेवा देण्याचे उद्दिष्ट एसटीने निश्चित केले आहे. विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच एसटी महामंडळाच्या ताफ्यामध्ये व्होल्वो बसेस समाविष्ट होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

२५० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराच्या किमान पाच ते सहा तासांच्या प्रवासासाठी आरामदायी ४५ आसनी बसेस, तर रात्रीच्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी ३० किंवा ४५ शयनयान क्षमतेच्या बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे दिवसा तसेच रात्रीच्या प्रवाशांना त्यांच्या गरजेनुसार प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे.

प्रवाशांना केवळ आरामदायी बसच नव्हे, तर हाय-एंड प्रवासी सेवांचा अनुभव मिळावा यासाठी नव्या व्होल्वो बसेसमधील आतिथ्य व्यवस्थापनासाठी खासगी संस्थेची मदत घेण्यात येणार आहे. प्रवाशांचे स्वागत, बसमधील मूलभूत सुविधा, स्वच्छता, प्रवाशांना आवश्यक माहिती आणि सेवा-सुविधांचे व्यवस्थापन यामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळाचा वापर केला जाणार आहे.

### ■ मोबाइलवरून तिकीट बुकिंग; खासगी ॲपवरही आरक्षणाची सुविधा



नव्या आराम बससेवेचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रवाशांना डिजिटल पद्धतीने सहज आरक्षण करता येणार आहे. एसटीच्या अधिकृत ऑनलाइन आरक्षण व्यवस्थेबरोबरच खासगी डिजिटल ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मवरूनही या बसेसचे तिकीट आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचा महामंडळाचा मानस आहे. त्यामुळे प्रवाशांना बसस्थानकावर येऊन तिकीट काढण्याची आवश्यकता राहणार नाही. मोबाइलवरून बसची वेळ, मार्ग आणि उपलब्ध आसनांची माहिती घेऊन घरबसल्या आरक्षण करता येणार आहे.



डोंबिवली : भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांना वाढदिवसानिमित्त प्रदेश चिटणीस तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी सभागृहनेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, प्रभाग समिती सभापती रवींद्र जोशी, नगरसेवक संतोष शेट्टी, प्रवीण पाटील, अरुणकुमार भगत, सुमित झुंजारराव, प्रदीप भगत, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, वाहतूक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रभुदास भोईर, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, रवी गोवारी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे आदी उपस्थित होते. सर्वांनी प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांचे अभीष्टचिंतन केले. (अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

# पंतप्रधान नरेंद्र मोदी, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेलमध्ये रक्तदान शिबिर

## भाजप अल्पसंख्याक मोर्चाचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त अल्पसंख्याक मोर्चा उत्तर रायगड जिल्ह्याच्या वतीने पनवेलच्या खांदा कॉलनीमध्ये रविवारी (दि. २०) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमास रक्तदात्यांचा प्रतिसाद लाभला.

शिबिराला भाजप प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले.

संपूर्ण कोकण प्रांतामध्ये रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली होती. खांदा कॉलनीतील रोटरी क्लब ऑफ न्यू पनवेल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित लेट डॉ. बी.व्ही. लिमये ब्लड बँक येथे प्रदेश महामंत्री सय्यद अकबर आणि उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस इमरान शेख यांनी स्वतः रक्तदान



करून शिबिरास प्रारंभ केला.

रक्तदान केल्यानंतर सय्यद अकबर म्हणाले की, रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांना आदर्शस्थानी ठेवून मी कार्यरत असून रक्तदान शिबिराला मुस्लीम समाजाचा भरघोस पाठिंबा मिळतोय याचे मला अत्यंत समाधान आहे.

रक्तदान शिबिराच्या आयोजनासाठी अल्पसंख्याक मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष तथा उरणचे नगरसेवक जसिम गॅस, सरचिटणीस अमन अख्तर, इमरान शेख, उपाध्यक्ष इमरान खान, चिटणीस नासिर शेख, असिफ काझी यांनी परिश्रम घेतले. यावेळी ६६ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले.

## मुंबईत विजेचा धक्का लागून दोघींचा मृत्यू, चार जण जखमी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत लालबागचा राजा गणेशोत्सव मंडळाच्या दर्शन रांगेमध्ये उभ्या असलेल्या एका तरुणाचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच काळाचौकी भागातील गणपती मंडळाजवळ विजेचा धक्का लागल्याने आठ वर्षांच्या मुलीसह दोघींचा मृत्यू, तर चार जण जखमी झाले आहेत. रविवारी (दि.२०) मध्यरात्री अडीचच्या सुमारास हा प्रकार घडला.

काळाचौकी येथील दत्ताराम लाड मार्गावरील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या महागणपतीचे दर्शन घेण्यासाठी उभ्या असलेल्या भाविकांना विजेचा शॉक लागला. या दुर्घटनेत रागिणी यादव (८) आणि ३३ वर्षीय सुजाता यांचा मृत्यू झाला. जखमींमध्ये किरण अकबर नाईक (१९), तन्वी नर्शे हांडे (१९), साहिल संदीप तरे (१९) आणि रुही सिंग (१२) यांचा समावेश असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यापैकी रुहीला आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले आहे. स्थानिक पोलिसांकडून घटनेबाबत अधिक माहिती घेतली जात आहे.

# शेतीच्या वादातून एकाची हत्या

## खालापुरातील घटना; दोन जण ताब्यात

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील निगडोली गावाच्या हद्दीत शेतीच्या वादातून झालेल्या मारहाणीत ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी घडली. याप्रकरणी भावकीतील दोन व्यक्तींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मृत व्यक्तीचे नाव लक्ष्मण पांडू डुकरे आहे, तर रोहिणी भगवान पाटील, (रा. नारपोली, ता. पनवेल) आणि दीपक पांडुरंग पाटील अशी आरोपींची नावे आहेत. एकीकडे पाच दिवसांच्या गणरायाला गौरींसह भक्तिभावाने निरोप देण्याची तयारी सुरू असतानाच निगडोली गावच्या हद्दीत सकाळी घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

मयत लक्ष्मण डुकरे यांचा मुलगा जयेंद्र आणि भावकीतील बहीण रोहिणी पाटील यांचा यापूर्वी शेतीच्या जागेवरून वाद झाला होता. रोहिणी आणि तिचा नातेवाईक दीपक पाटील शनिवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास पुन्हा निगडोली येथील लक्ष्मण डुकरे यांच्या शेतघरावर आले होते. यावेळी रोहिणी आणि दीपक यांनी लक्ष्मण यांना खाली ढकलून दिले, तर जयेंद्रलाही लाकडी दांडक्याने मारहाण केली. जखमी लक्ष्मण यांना चौक येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप शिंगटे यांनी घटनास्थळी जाऊन प्रकरणाची माहिती घेतली. याप्रकरणी मयत लक्ष्मण डुकरे यांचा मुलगा जयेंद्र यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून रोहिणी पाटील आणि दीपक पाटील यांना ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## निवडक

### कोस्टल रोडवर भीषण अपघात; तिघांचा मृत्यू

**मुंबई :** कोस्टल रोडवर मरीन ड्राइव्हवरून हाजी अलीच्या दिशेने जाणाऱ्या भरधाव बीएमडब्ल्यू कारचा रविवारी (दि.२०) पहाटे साडेपाचच्या सुमारास भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला असून एक गंभीर जखमी झाला आहे. हे तरुण अहमदाबादचे रहिवासी असून मुंबईत शिक्षण घेत होते. कार पुलाच्या कठड्याला धडकून खाली कोसळतानाचा थरारक सीसीटीव्ही व्हिडीओ समोर आला आहे.

### नवी मुंबईतील १० टक्के पाणीकपात तात्पुरती स्थगित

**नवी मुंबई :** येथील महानगरपालिका क्षेत्रात लागू करण्यात आलेली १० टक्के पाणीकपात तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. दरम्यान, नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने आणि जबाबदारीने वापर करून पाण्याची बचत करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# टीम इंडिया आशियाई क्रीडा स्पर्धेच्या फायनलमध्ये

## बांगलादेशचा धुव्वा; शफाली वर्माचे शतक

**नागोया (जपान) : वृत्तसंस्था**

आशियाई खेळ २०२६मधील महिला क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघाने धमाकेदार कामगिरी सुरू ठेवत अंतिम फेरीत धडक मारली आहे. उपांत्य सामन्यात शफाली वर्माचे तडाखेबंद शतक आणि गोलंदाजांच्या दमदार कामगिरीच्या जोरावर भारताने बांगलादेशचा तब्बल ११४ धावांनी पराभव केला.

भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित षटकांत चार गडी गमावून मजबूत १९५ धावा केल्या होत्या. युवा फलंदाज शफाली वर्मा भारताच्या या विजयाची खरी शिल्पकार ठरली. तिने अवघ्या ४९ चेंडूंमध्ये नाबाद १०० धावांची आतषबाजी करीत आपल्या व्हाईट-बॉल कारकिर्दीतील पहिलेवहिले शतक झळकावले. कर्णधार हरमनप्रीत कौरने ३३ चेंडूंमध्ये ४० धावांचे योगदान दिले.

विजयासाठी मिळालेल्या १९६ धावांच्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना बांगलादेशचा संघ आपली पूर्ण षटकेही खेळू शकला नाही आणि अवघ्या १५.४ षटकांत ८१ धावांवर त्यांचा डाव संपुष्टात आला. बांगलादेशकडून सलामीवीर दिलारा अख्तरने सर्वाधिक २८ धावा केल्या.

भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच बांगलादेशच्या फलंदाजांवर दबाव कायम ठेवला. दीप्ती शर्माने २.४ षटकांत केवळ सात धावा देत तीन बळी टिपले. नंदिनी शर्माने चार षटकांत २५ धावा देत तीन विकेट्स, तर श्री चरणीने तेवढ्याच षटकांत सात धावा देत दोन महत्त्वपूर्ण विकेट्स घेतल्या.



### पुन्हा श्रीलंकेविरुद्ध फायनल

*भारत आता आपले गतविजेतेपद टिकवण्यासाठी अंतिम सामन्यात श्रीलंकेविरुद्ध मैदानात उतरणार आहे. विशेष म्हणजे यापूर्वी १३ सप्टेंबर रोजी झालेल्या आशिया कपच्या अंतिम सामन्यात भारताने श्रीलंकेचा पराभव केला होता.*

# विविध घटकांच्या हस्ते गणरायाची आरती

## पनवेलच्या महापौरांचा शिवनेरी निवासस्थानी अभिनव पायंडा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवानिमित्त लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यात सुसंवाद साधण्यासाठी पनवेलचे महापौर नितीन पाटील यांनी एक अभिनव पायंडा पाडला आहे. खारघर येथील त्यांच्या शिवनेरी निवासस्थानी विराजमान श्री गणरायाची आरती महापालिकेचे विविध प्रशासकीय विभाग, पोलीस दल, सुरक्षा रक्षक, आरोग्य कर्मचारी आणि आदिवासी बंधू-भगिनींच्या हस्ते करण्यात आली.

या अभिनव उपक्रमामुळे महापौरांच्या निवासस्थानी सामाजिक एकता आणि बंधुभावाचा मंगलमय जागर पाहायला मिळाला. महापौर निवासस्थानी गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशीची



आरती पोलिसांच्या हस्ते झाली. त्यानंतर संध्याकाळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त तसेच विविध विभागांचे प्रमुख आरतीमध्ये सहभागी झाले.

शहराच्या पायाभूत सुविधा आणि आरोग्याची धुरा सांभाळणाऱ्या घटकांचा आदर राखत महापालिकेचे शहर अभियंता, कनिष्ठ अभियंते, आरोग्य निरीक्षक, स्वच्छतादूत यांच्या हस्तेही आरती करण्यात आली. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख उपस्थित होते. (पान २ वर..)

### सामाजिक बांधिलकी जपली

महापौर निवासस्थानी चौथ्या दिवशीची आरती चाफेवाडी व फणसवाडी येथील आदिवासीवाडीतील महिला, पुरुष आणि लहान मुलांच्या हस्ते झाली. गणेशोत्सवाचा आनंद समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्याच्या उद्देशाने महिला भगिनींना साडी-चोळी, पुरुष व लहान मुलांना नवीन पोशाख देऊन सन्मानित करण्यात आले तसेच चाफेवाडी व फणसवाडी येथील स्थानिक क्रिकेट संघाला प्रोत्साहन देण्याच्या हेतून क्रीडा साहित्याकरिता (बॅट, स्टम्प व बॉल) आर्थिक मदत महापौरांच्या वतीने सुपूर्द करण्यात आली. यावेळी आदिवासी भगिनींनी पारंपरिक गाण्यांच्या तालावर फेर धरून नृत्य सादर केले.



# गणेशभक्तांचा परतीचा प्रवास सुरू

## माणगाव, वडखळमध्ये वाहनांच्या रांगा; पोलीस तैनात

**अलिबाग : प्रतिनिधी**

गौरी-गणपती सण साजरा करून कोकणातून मुंबईकडे परतणाऱ्या गणेशभक्तांच्या सोयीसाठी रायगड जिल्हा प्रशासन आणि एसटी महामंडळाने चोख नियोजन केले. रविवारी पहाटेपासून महामार्गावर वाहनांची संख्या वाढल्याने माणगाव, इंदापूर आणि वडखळ-पेण परिसरात काही काळ वाहतुकीचा ताण जाणवला, मात्र पोलिसांनी तातडीने वाहतूक सुरळीत करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. पहाटे दोन वाजल्यापासून



महामार्गावरील वाहनांची वर्दळ वाढली होती. माणगाव आणि इंदापूर येथे रस्ता अरुंद असल्याने आणि पूल तसेच बाह्यवळण रस्त्यांची कामे सुरू असल्याने तात्पुरती कोंडी निर्माण झाली होती. बेशिस्त वाहनचालकांकडून लेनची शिस्त न पाळल्याने काही ठिकाणी पाच ते सहा किलोमीटरपर्यंत रांगा लागल्या होत्या. संध्याकाळच्या सुमारास दक्षिण रायगडात जोरदार पाऊस झाल्यानेही वाहतुकीवर परिणाम झाला. तरीही प्रशासनाच्या नियोजनामुळे परिस्थिती नियंत्रणात राहिली.

माणगाव येथील वाहतूक कोंडी फोडण्याच्या प्रयत्नात माणगाव ते पुणे मार्गावरही तात्पुरता ताण आला होता, मात्र पोलिसांच्या सततच्या उपस्थितीमुळे वाहतूक सुरळीत ठेवण्यात यश आले. दुपारनंतर बसेस आणि खासगी वाहनांची संख्या वाढल्यानंतरही वाहतूक पोलिसांनी रात्री उशिरापर्यंत मार्ग मोकळा ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवले. दरम्यान, मुंबईकडे परतणाऱ्या गणेशभक्तांसाठी रायगड जिल्ह्यातील एसटी महामंडळाने विशेष खबरदारी घेतली होती. सकाळपासूनच बसस्थानकांवर प्रवाशांची गर्दी असतानाही नियमित फेऱ्यांव्यतिरिक्त आठ आगारांमधून ५००हून अधिक जादा गाड्या सोडण्यात आल्या. त्यामुळे प्रवाशांची मोठी सोय झाली.

# पनवेलमध्ये ८०० किलो गोमांस जप्त; दोघे गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

नांदगाव येथील सिडको मैदान परिसरात गोवंशाची कत्तल करून मांसविक्री केल्याच्या आरोपावरून पनवेल शहर पोलिसांनी इम्रान हनिफ पटेल (३२) आणि सर्फराज मैनुद्दीन पटेल उर्फ हाग्या (४१) या दोघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून सुमारे ८०० किलो गोमांस, दोन ऑटोरिक्षा, दोन चाकू आणि एक कुऱ्हाड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार नांदगाव येथील सिडको मैदान परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. घटनास्थळी तीन जिवंत गोवंशीय जनावरेही आढळून आली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम १०९, १३२, शस्त्र अधिनियम कलम ४, २५, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५(बी), ५(सी), ९, ९(ए) तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम कलम ११(१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अभिजित अभंग, उपनिरीक्षक किरण राऊत, पोहवा अमोल पाटील, योगेश दिवेकर, अविनाश गंथडे, पोना मिथुन भोसले, सोमनाथ म्हात्रे, शशिकांत काकडे आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे सुमारे तीन लाख २० हजार रुपये किमतीचे ८०० किलो मांस, प्रत्येकी सुमारे ५० हजार रुपये किमतीच्या दोन ऑटोरिक्षा तसेच कत्तलीसाठी वापरलेली हत्यारे हस्तगत केली.

या गुन्ह्यात आणखी काही संशयितांचा सहभाग असल्याचा पोलिसांचा संशय असून त्यांचा शोध सुरू आहे. मांस कोठून आणले, पुरवठा कोणी केला, विक्री कोणाला केली तसेच वापरलेली वाहने व साधनसामग्री याबाबत तपास सुरू आहे. मुंबई, ठाणे आणि रायगड परिसरात मांसाच्या खरेदी-विक्रीचे जाळे कार्यरत आहे का, याचाही तपास सुरू असल्याचे पोलिसांनी न्यायालयात सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे.

## निवडक

### करंजाडेमध्ये घरफोडी

**पनवेल** : करंजाडे येथील एका बंद फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने दोन लाख ६६ हजार ५०० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध घरफोडी व चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार करंजाडे सेक्टर आर-४ येथील सूर्यकिरण इमारतीमधील फ्लॅट क्रमांक २०५ येथे ही चोरी झाली. फिर्यादी पिंका प्रफुल्ल चौधरी यांच्या घरात अज्ञात चोरट्याने प्रवेश करून सोन्याचे कानातील झुमके, रिंग, अंगठ्या तसेच चांदीच्या अंगठ्या असा एकूण दोन लाख ६६ हजार ५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अज्ञात चोरट्याचा शोध पोलीस घेत आहेत.

### हद्दपार आरोपीकडून पोलिसांना शिवीगाळ

**नवीन पनवेल** : हद्दपार आदेशाच्या अटी आणि शर्तीचे उल्लंघन करून प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश केलेल्या आरोपीला पकडण्यासाठी पोलीस गेले असता त्याने पोलिसांना शिवीगाळ करून तो तिथून पळून गेला. याप्रकरणी रमजान हुसेन अब्दुल जलील खान (रा. पाटीलवाडी, पाले खुर्द) याच्या विरोधात १८ सप्टेंबर रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास कमल पंजाब बार अँड रेस्टॉरंट, नावडे ब्रिजखाली या ठिकाणी आरोपी रमजान याने हद्दपार आदेशाच्या अटी आणि शर्तींचे उल्लंघन केले आणि परवानगी नसताना प्रतिबंधित केलेल्या क्षेत्रात प्रवेश केला. यावेळी पोलीस शिपाई सागर पाटील यांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने पोलिसांना शिवीगाळ केली आणि तेथून पळून गेला.

### तरुणाला बंदिस्त करून मारहाण

**नवीन पनवेल** : २१ वर्षीय तरुणाच्या घरात प्रवेश करून त्याला बंदिस्त करून मारहाण आणि शिवीगाळ केल्याप्रकरणी सहा जणांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात १७ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुमितकुमार महतो रोहिंजण, सेक्टर ३६ येथे राहत असून त्याच्या घरात नीरज मिश्रा, रौनक मिश्रा, हर्ष तिवारी, संदीप सिंग, नाज बाबू, आणि प्रवीण चौहान यांनी परवानगीशिवाय प्रवेश केला आणि सुमितकुमारला १२ सप्टेंबर रोजी बंदिस्त करून मारहाण आणि शिवीगाळ केली.

### लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**नवीन पनवेल** : लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी तालीब शेख (रा. तळोजा) याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात १७ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पीडित फिर्यादी यांना आरोपी तालीब शेख याने लग्न करण्याचे आमिष दाखवले आणि त्यांच्यावर अत्याचार केला. यावेळी लग्न करण्यास सांगितले असता त्याने लग्न करण्यास नकार दिला आणि फिर्यादीला दमदाटी केली.

### अज्ञाताकडून ऑनलाइन फसवणूक

**नवीन पनवेल** : क्रेडिट कार्डमधून एक लाख ६७ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात १७ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उमेश कुमार ढाकणलाल हे बालाजी सिम्फनी, सुकापूर येथे राहत असून ते त्यांच्या क्रेडिट कार्डचा वापर ऑनलाइन खरेदीसाठी करतात. ७ ते ८ ऑगस्टदरम्यान त्यांच्या मोबाइलवर अज्ञाताने वेगवेगळ्या कंपनीच्या नंबरवरून मोठ्या प्रमाणात ओटीपी पाठवले. त्यांच्या फोनचा नकळत अ‍ॅक्सेस घेतला आणि बँकेच्या क्रेडिट कार्डच्या माहितीचा वापर करून कल्याण ज्वेलर्सच्या गोल्ड कॉइन खरेदी, गिफ्ट कार्ड खरेदी करण्यासाठी क्रेडिट कार्डमधून एक लाख ६७ हजार रुपये डेबिट करून त्यांची फसवणूक केली.

# रामसर स्थळातील कांदळवनातून एक टन कचरा हटवला

## एनव्हायरन्मेंट लाईफ फाउंडेशनची मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

आंतरराष्ट्रीय किनारा स्वच्छता दिन आणि जागतिक स्वच्छता दिनाच्या औचित्यावर एनव्हायरनमेंट लाईफ फाउंडेशनने करवे जेटी, नेरूळ येथे सलग ३१८ व्या आठवड्याची कांदळवन स्वच्छता मोहीम आयोजित केली. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या 'स्वच्छ सागर, सुरक्षित सागर ५.०' या राष्ट्रीय मोहिमेला समर्पित या उपक्रमात मुंबई महानगर प्रदेशातील स्थानिक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसह सुमारे १२५ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

मोहिमेत सागरी जैवविविधतेला आणि कांदळवनांना धोका निर्माण करणारा सुमारे एक टन कचरा हटवण्यात आला. शहरी नाले, उघडे गटार आणि सांडपाण्याच्या वाहिन्यांद्वारे थेट समुद्रात येणारा घरगुती कचरा, प्लास्टिक पॅकेजिंग आणि एफएमसीजी वस्तू मोठ्या प्रमाणावर साचल्याचे स्वयंसेवकांनी पाहिले. "कचरा उचलणे हा दुय्यम उपाय आहे, परंतु सर्वात पहिली पायरी म्हणजे मुळापासून कचरा टाकणे थांबवणे. मानव या ग्रहाचा मालक नाही; पृथ्वीवरील सर्व जीवांचे रक्षण करणे ही आपली सर्वांची समान जबाबदारी आणि कर्तव्य आहे," असे संस्थापक धर्मेश बरई यांनी सांगितले. या मोहिमेतून काही ठोस उपाय सुचवण्यात आले.

नागरिकांनी उघड्या नाल्यांमध्ये किंवा जलस्रोतांमध्ये कचरा न टाकता योग्य कचराकुंडीतच टाकावा. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र शासनाने कचरा समुद्रात, कांदळवनात जाण्यापूर्वीच रोखण्यासाठी सर्व प्रमुख नाले व झोपडपट्ट्यांमधील नाल्यांवर 'ट्रॅश ट्रॅपर' बसवावेत. किनारपट्टी भागात समुदाय-आधारित स्वच्छता मोहिमा व जनजागृती उपक्रम राबवून सागरी परिसंस्थेचे रक्षण करावे, असे आवाहन करण्यात आले.

हा उपक्रम मँग्रोव्ह फाउंडेशन, अर्थ डे नेटवर्क आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने पार पडला.



# पुनर्विकासाला गती देण्यासाठी 'क्रेडाई'चे प्रदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई आणि रायगड परिसरातील पुनर्विकास प्रक्रियेला अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी क्रेडाईतर्फे 'ईज ऑफ डूइंग रिडेव्हलपमेंट'च्या दुसऱ्या आवृत्तीचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी २७ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० ते रात्री ८ वाजेपर्यंत नवी मुंबईतील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये हे एकदिवसीय प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

नवी मुंबईतील विविध नोड्स तसेच रायगड परिसरातील १५००हून अधिक गृहनिर्माण संस्था या प्रदर्शनाला भेट देतील, तर ४०हून अधिक विकासक सहभागी होणार आहेत. मागील कार्यक्रमात सुमारे ८०० ते १,००० गृहनिर्माण संस्थांनी सहभाग नोंदविला होता. यंदा विकासकांचा सहभाग वाढविण्यात आला असून गृहनिर्माण संस्था व विकासकांत थेट संवाद साधण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

पुनर्विकास प्रक्रियेतील विविध टप्पे, मूल्यांकन, चर्चा, सल्लामसलत आणि सामूहिक निर्णय प्रक्रिया याबाबत पारदर्शकता, जनजागृती आणि सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने या प्रदर्शनाची रचना करण्यात आली आहे. या प्रदर्शनामध्ये सोसायटीचे प्रतिनिधी आणि मालमत्ता मालकांना पुनर्विकास प्रक्रियेबाबत माहिती मिळणार असून विकासकांशी थेट संवाद साधता येणार आहे.

# पेण तालुक्यात गणरायांना भावपूर्ण वातावरणात निरोप

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात पाच दिवसांच्या गणपतींना गणेशभक्तांकडून भावपूर्ण निरोप देण्यात आला. पेणमध्ये सायंकाळी ५ वाजल्यापासून विसर्जनास सुरुवात झाली. यावेळी ठिकठिकाणी नाशिक ढोल, बँजोच्या तालावर मिरवणुका काढण्यात आल्या. यावेळी नंदीमाळ नाका येथे नगराध्यक्ष प्रीतम पाटील, सभापती अफ्रिन अखवारे, सभापती कलावती पाटील, सभापती संगीता लाड, अजय क्षीरसागर, भाजप महिला



मोर्चा अध्यक्ष सुप्रिया चव्हाण, रवींद्र म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

विसर्जनानिमित्त तालुक्यात सर्वत्र नदी, तलावांवर मोठ्या संख्येने गणेशभक्तांनी गर्दी केली होती. हातगाडी, चारचाकी, रथ, टेम्पोवरून गणरायांची मिरवणूक विसर्जन स्थळी मार्गस्थ होत होती. दुपारपासून संध्याकाळी उशिरापर्यंत विसर्जन सुरू होते. भोगेश्वरी विसर्जन घाटावर आणि कासार तळे येथे बाप्पांचे विसर्जन करण्यात आले, त्यामुळे परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते. पेण नगरपरिषदेच्या वतीने विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली होती, तसेच भक्तांना वारंवार सूचना देण्यात येत होत्या.पाच दिवसांच्या गणपती विसर्जनासाठी पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस यंत्रणा पूर्णपणे सज्ज ठेवण्यात आली होती.

छत्रपती संभाजी महाराज चौक, नंदीमाळ नाका, गांधी मंदिर, भोगावती नदी अशा ठिकाणी पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. यासाठी एक पोलीस निरीक्षक, आठ सहाय्यक पोलीस निरीक्षक, ३९ पोलीस अंमलदार, चार वाहतूक अंमलदार, १० पोलीस शिपाई, आठ होमगार्ड, एक राखीव पोलीस दलाची तुकडी आणि एक दंगल नियंत्रण पथक असा फौजफाटा तैनात करण्यात आला होता.

# माणगावच्या आरती दळवीची राष्ट्रीय स्पर्धेत 'सुवर्ण' कामगिरी

**माणगाव : प्रतिनिधी**

जिद्द, मेहनत आणि सातत्याच्या जोरावर आरती अभिनंदन दळवी हिने राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत घवघवीत यश संपादन करत गोरेगावच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. हरियाणा येथे पार पडलेल्या २२व्या मास्टर्स नॅशनल स्विमिंग चॅम्पियनशिप २०२६मध्ये तिने तब्बल पाच सुवर्ण आणि एक रौप्य अशी एकूण सहा पदके पटकावली. या शानदार कामगिरीनंतर तिची द्वितीय आशियाई मास्टर्स स्विमिंग चॅम्पियनशिप २०२६साठी निवड झाली असून ती आता भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे.



११ ते १३ सप्टेंबर या कालावधीत हरियाणात झालेल्या राष्ट्रीय मास्टर्स जलतरण स्पर्धेत देशभरातील जलतरणपटूंनी सहभाग घेतला होता. आरतीने विविध प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करीत एकामागोमाग पदकांची कमाई केली. पाच सुवर्णपदकांसह सहा पदके पटकावत राष्ट्रीय स्तरावर जलतरण कौशल्याची मोहोर उमटवली. राष्ट्रीय स्पर्धेतील यशानंतर तिच्या कारकिर्दीत एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. ४ ते १० ऑक्टोबरदरम्यान बंगळुरू येथे होणाऱ्या द्वितीय आशियाई मास्टर्स स्विमिंग चॅम्पियनशिपसाठी तिची निवड झाली आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत ती भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत आंतरराष्ट्रीय स्तरावर कौशल्य आजमावणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील पाच सुवर्णपदकांची ही कामगिरी आरती हिच्या सातत्यपूर्ण सरावाची, आत्मविश्वासाची आणि जिद्दीची पावती ठरली आहे.

# कर्जतमध्ये रेल्वेचा राजा मंडळातर्फे रक्तदान शिबिर; २७ जणांनी दिले योगदान

**कर्जत : प्रतिनिधी**

रेल्वेचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ कर्जत व समर्पण रक्तकेंद्र, घाटकोपर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २७ जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले कर्जत-खालापूर तालुक्यातील हे ५४७ वे रक्तदान शिबिर ठरले.




कर्जत रेल्वे स्थानकाच्या कामगार भवन सभागृहात या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष महेश भोसले, उपाध्यक्ष प्रदीप पेटकर, सचिव मनीष बॅनर्जी, खजिनदार उमेश देशमुख, प्रभाकर करंजकर, सयाजी गायकवाड, जयवंत म्हसे, डॉ. प्रशांत सदावर्ते, आमिर मणियार आदी उपस्थित होते. रक्त संकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तकेंद्राचे डॉ. रमेश सिंग, आरोग्य सेविका शिला वाघमारे, श्रीराम नाईक, सुनील निले, दिपेश सरदार, विकास भालेराव आदींनी केले.

पान १ वरुन

### विविध घटकांच्या हस्ते गणरायाची आरती

यासोबतच महाराष्ट्र सुरक्षा बल आणि रायगड सुरक्षा रक्षक दलाच्या जवानांनी श्रद्धेने गणरायाची आरती करून दर्शन घेतले. उत्सवाच्या पाचव्या दिवशी महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच आपत्कालीन सेवेत कार्यरत असणाऱ्या अग्निशमन दलाच्या जवानांच्या हस्ते आरती झाली.

या गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजातील, प्रशासनातील विविध घटकांना एकत्र आणत समता, बंधुभाव आणि सामाजिक एकोप्याचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमामुळे पालिका प्रशासन, पोलीस, आदिवासी बंधू-भगिनी अशा विविध घटकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# गुलाबपुष्प देऊन सामाजिक सलोख्याचा संदेश

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कळंबनजीकच्या चिकणपाडा येथे सहा दिवसांच्या गौरी-गणपती बाप्पाला भक्तिभावाने निरोप देताना सामाजिक कार्यकर्ते तौसिफ गुलामरसुल नाचण यांच्या पुढाकारातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रेरणादायी दर्शन घडले. विसर्जनासाठी गणेश घाटाकडे जाणाऱ्या हिंदू बांधवांचे मुस्लिम समाजातील युवकांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत करत सामाजिक सलोख्याचा संदेश दिला.हा स्वागत उपक्रम तौसिफ नाचण यांनी प्रथमच आयोजित केला असला तरी चिकणपाडा येथे अनेक वर्षांपासून गणेश विसर्जन एकोप्याच्या वातावरणात होत आहे. विशेष म्हणजे त्यांचे वडील कै. गुलामरसुल नाचण यांनी समाजातील सलोखा आणि बंधुभाव जपण्यासाठी स्वतःच्या मालकीची दोन गुंठे जागा गणेश घाटासाठी विनामूल्य उपलब्ध करून दिली होती. त्या जागेवर आजही गावातील गणेश विसर्जनाची परंपरा सुरू आहे. 'धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच' हा संदेश देत सर्व धर्मांचा परस्पर सन्मान आणि एकमेकांच्या सण-उत्सवात सहभागी होण्याची भावना हीच समाजाची खरी ताकद असल्याचे तौसिफ नाचण यांनी सांगितले.



# पनवेलमध्ये ११ हजारांहून अधिक गौरी-गणपतींचे विसर्जन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागांत व नावडे उपविभागात सुमारे ११ हजार २८० घरगुती गौरी-गणपती तसेच सार्वजनिक गणपतींचे भक्तिमय वातावरणात शांततेत विसर्जन करण्यात आले. माझी वसुंधरा ७.० अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी पनवेल महानगरपालिका विविध उपक्रम राबवित आहे.

या अंतर्गत सणांचे पावित्र्य आणि पर्यावरणाचे भान राखले जावे यासाठी महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी 'उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा' ही मोहीम हाती घेतली आहे. गणेशभक्तांच्या सोयीसाठी पालिकेच्या बांधकाम, आरोग्य, विद्युत, परवाना, भांडार, वाहन, वैद्यकीय व पर्यावरण विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवर संपूर्ण तयारी करण्यात आली होती. याकामी विविध एनजीओ, सामाजिक संघटनांचेही महापालिकेला सहकार्य लाभले. यावर्षी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या वतीने एकूण १०६ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली होती. यामध्ये २९ ठिकाणी नैसर्गिक विसर्जन स्थळे असून ७७ ठिकाणी कृत्रिम तलावांची सोय करण्यात आली होती.

या सर्व विसर्जनस्थळी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटीव्ही, स्टेज, टॉवर, टेबल-खुर्च्या, लाऊड स्पीकर, निर्माल्य कलश, लाईफ जॅकेटची सोय करण्यात आली होती. विसर्जन कार्यक्रम सुरळीत पार पडावा यासाठी सर्व प्रभाग सभापती, सर्व महापालिका सदस्यांनी आपापल्या प्रभागांतील विसर्जनस्थळांना भेटी देऊन मार्गदर्शन केले. तसेच आयुक्त मंगेश चितळे यांनी विविध विसर्जनस्थळांना भेटी देऊन कामकाजाची पाहणी केली. अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त रविकिरण घोडके, उपायुक्त नानासाहेब कामठे, उपायुक्त अभिषेक पराडकर, शहर अभियंता राजेश कर्डिले, सहायक आयुक्त डॉ. रूपाली माने, सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर, चारही प्रभाग अधिकारी, महापालिका अधिकारी-कर्मचारी यांनी सर्व विसर्जन ठिकाणांना भेटी देऊन व्यवस्थापन केले.

विसर्जन घाटांवर गणपतींचे सुरळीत विसर्जन व्हावे यासाठी महापालिकेच्या वतीने अग्निशमन दल, वाहतूक, विद्युत, बांधकाम, घनकचरा व आरोग्य विभागातील स्वच्छता निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, सफाई कर्मचारी, मुख्यालय कर्मचारी तसेच पोलीस विभागाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने प्रत्येक विसर्जनस्थळी प्राथमिक उपचार सेवा देण्यात आली. कृत्रिम तलावांमध्ये गणपती विसर्जन करणाऱ्या नागरिकांना महापालिकेच्या वतीने प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.










**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या लाडक्या गणरायाला शनिवारी भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. विसर्जनापूर्वीच्या आरतीत संपूर्ण ठाकूर कुटुंबीयांसह उपस्थित नागरिक आणि कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. विसर्जनावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर, शकुंतला ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, भरतशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, वर्षा ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, अर्चना ठाकूर, विशाल ठाकूर, स्वप्नील ठाकूर, प्रतीक ठाकूर, नारायण ठाकूर यांच्यासह ठाकूर कुटुंबातील सर्व सदस्य, नातेवाईक आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.**










पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे भाजप जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, नंदू पटवर्धन, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, शरद खारकर, नगरसेवक राजू सोनी, पवन सोनी, प्रवीण पाटील, निलेश पाटील, जीवन गावंड, मीनाक्षी पाटील, न्हावे ग्रामपंचायत सदस्य रंजना पाटील, सुनीता पाटील, प्रभाकर कांबळे आदी मान्यवरांनी विसर्जनापूर्वी दर्शन घेतले.

# महापौर निवासस्थानी बाप्पाला भावपूर्ण निरोप; कृत्रिम तलावात पर्यावरणपूरक विसर्जन






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील महापौर निवासस्थान 'शिवनेरी' येथे विराजमान लाडक्या श्री गणरायाचे शनिवारी अत्यंत भक्तिभावाने, ढोल-ताशांच्या गजरात आणि मंगलमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. गणेशोत्सवाच्या पावन काळात शिवनेरी निवासस्थानी निर्माण झालेला भक्तीचा उत्साह आणि धार्मिक वातावरणाचा आनंद बाप्पाला निरोप देताना सर्व उपस्थितांना भावूक करणारा ठरला.

विसर्जनापूर्वी करण्यात आलेल्या आरतीनंतर 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' आणि 'मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. महापौर नितीन पाटील यांनी विघ्नहर्त्या श्री गणरायाच्या चरणी माथा टेकवून नतमस्तक होत पुढील वर्षी पुन्हा लवकर येण्याची मनोभावे प्रार्थना केली. यावेळी बोलताना महापौरांनी बाप्पाच्या कृपाशीर्वादाने संपूर्ण पनवेलकरांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी, आनंद आणि उत्तम आरोग्य नांदो तसेच प्रत्येक नागरिकाच्या मनोकामना पूर्ण होवोत, अशी भावना व्यक्त केली.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देण्याच्या हेतूने शिवनेरी येथील गणरायाचे विसर्जन कृत्रिम तलावात भक्तिभावाने करण्यात आले. पारंपरिक वाद्यांचा गजर, गुलालाची उधळण आणि उपस्थितांचा उत्साह यामुळे विसर्जन सोहळा अत्यंत नेत्रदीपक ठरला. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, प्रभाग समिती सभापती मधू पाटील, रुपेश नागवेकर, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष हिमेश बहिरा यांच्यासह विविध क्षेत्रांतील राजकीय, सामाजिक मान्यवर आणि नागरिक उपस्थित होते.



# पर्यावरणपूरक बाप्पा : कामोठ्यात प्रमाणपत्र देऊन भाविकांचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील कृत्रिम तलावावर गौरी-गणपती विसर्जनाच्या ठिकाणी शाडू मातीच्या गणेशमूर्तीचे विसर्जन करणाऱ्या भाविकांना पनवेल महानगरपालिकेतर्फे प्रमाणपत्र देण्यात आले. कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्योती देशमुख यांच्या हस्ते या प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी महानगरपालिका अधिकारी, पोलीस कर्मचारी तसेच गणेशभक्त उपस्थित होते. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. कृत्रिम तलावावर विसर्जनाची व्यवस्था केल्याने पर्यावरण संवर्धनासोबतच विसर्जन प्रक्रिया सुरळीत पार पडण्यास मदत झाली.



**पनवेल : भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस तथा माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांच्या केळवणे येथील निवासस्थानी विराजमान गणपतीचे पं.स. सभापती रंजना वास्कर आणि कुंडेवहाळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सदाशिव वास्कर यांनी दर्शन घेतले.**

## संपादकीय

# बळीराजाला साथ

पावसाने यंदा काही भागांत ओढ दिली असली तरी संकटाच्या काळात शेतकऱ्याच्या पाठीशी शासन उभे राहणे हीच मोठी आश्वासक बाब आहे. पिकांचे नुकसान, पाणी-चारा आणि वीज या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याची दिशा सरकारने स्पष्ट केली आहे.

**महाराष्ट्र शेतीप्रधान राज्य आहे. त्यामुळे पावसातील खंडाचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनावर होतो. यंदा काही जिल्ह्यांमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पिकांच्या उत्पादनाची चिंता निर्माण झाली आहे. विशेषतः मराठवाड्यात परिस्थिती अधिक आव्हानात्मक आहे, मात्र अशा कठीण प्रसंगी संकटाकडे केवळ समस्या म्हणून न पाहता त्यातून मार्ग काढण्यासाठी शासनाने केलेले नियोजन महत्त्वाचे ठरते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही दिली आहे. मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील परिस्थितीचा आढावा घेऊन प्रत्येक जिल्ह्यातील परिस्थितीचे मूल्यमापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्राथमिक आढाव्यानंतर पंचनामे करून आवश्यक ती तातडीची मदत देण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेला स्पष्ट दिशा मिळाली आहे. संकटाच्या काळात केवळ आर्थिक मदत पुरेशी नसते. शेतकऱ्याला पिण्याचे पाणी, जनावरांसाठी चारा आणि शेतीसाठी वीज या मूलभूत गरजांचीही आवश्यकता असते. याचा विचार करून चाऱ्याची लागवड आधीपासूनच करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. ज्या भागात चाऱ्याची कमतरता भासेल, तेथे त्याचा पुरवठा करण्याची तयारी ठेवण्यात आली आहे. ही बाब पशुधनाच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. शेतीसाठी उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. ज्या भागात विहिरींमध्ये पाणी उपलब्ध आहे, तेथे पिके वाचविण्यासाठी सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. सायंकाळच्या काळात शेतकऱ्यांना अतिरिक्त वीज उपलब्ध व्हावी, यासाठीही उपाययोजना करण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. सिंगल फेजच्या भागांमध्येही वीजपुरवठा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पिकांना संजीवनी देण्यासाठी वीज आणि पाण्याचे योग्य नियोजन निश्चितच उपयुक्त ठरेल. शेतकऱ्यांसाठी सुरू असलेल्या कर्जमाफीच्या प्रक्रियेलाही या पार्श्वभूमीवर महत्त्व प्राप्त होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी सुरू असून लाभार्थ्यांच्या याद्याही प्रसिद्ध होत आहेत. आर्थिक अडचणींच्या काळात कर्जाचा भार कमी करण्याची प्रक्रिया वेगाने पुढे जाणे शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरू शकते. आजची परिस्थिती ही केवळ नुकसानभरपाईपुरती मर्यादित ठेवण्याची गरज नाही. पाण्याचे नियोजन, जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, चारा नियोजन आणि उपलब्ध पाण्यानुसार रब्बी पिकांचे नियोजन यावरही भर द्यावा लागेल. ज्या भागात पाणी उपलब्ध आहे, तेथे रब्बी हंगामाचे नियोजन करण्याची भूमिका मुख्यमंत्र्यांनी मांडली आहे. संकटातून पुढील हंगामाची तयारी करण्याची ही दृष्टी शेतकऱ्यांना पुन्हा उभारी देणारी ठरू शकते. बळीराजाच्या श्रमावर महाराष्ट्राचे अन्नसुरक्षेचे चक्र फिरते. त्यामुळे त्याच्या अडचणीच्या वेळी शासन, प्रशासन आणि समाजाने एकत्र उभे राहणे हीच खरी गरज आहे. पाऊस कमी असला तरी शासनाचा आधार, नियोजनाची साथ आणि शेतकऱ्याची जिद्द यामुळे संकटावर मात करण्याचा मार्ग नक्कीच खुला होऊ शकतो. आज गरज आहे ती निराश होण्याची नव्हे, तर उपलब्ध साधनांचा योग्य वापर करून शेतकऱ्याला नव्या हंगामासाठी सक्षम करण्याची!**

# शास्त्रीय गायक, संगीताचे अभ्यासक पं. जितेंद्र अभिषेकी



एक चतुरस्त्र गायक, संगीतकार व संगीतज्ञ अशी पं. जितेंद्र अभिषेकी यांची ओळख राहिली आहे. त्यांची आज जयंती. मूळ नाव गणेश व आडनाव नवाथे, पण मंगेशी देवस्थानातील पूजा व अभिषेक सांगणारे भिकाजी तथा बाळुबुवा यांचे पुत्र म्हणून आडनाव अभिषेकी झाले.

अभिषेकींचा जन्म २१ सप्टेंबर १९२९ रोजी गोव्यातील मंगेशी येथे झाला. त्यांचे वडील भिकाजी कीर्तनकार होते. वडिलांना कीर्तनात लहानपणी साथ केल्याने स्वर, ताल, लय व उच्चार यांची त्यांना चांगली जाण आली. संगीताचे सुरुवातीचे धडे त्यांनी जितेंद्रांना दिले. संगीताबरोबर संस्कृत भाषाही त्यांना शिकविली. बांदिवड्याच्या गिरिजाबाई केळेकर या त्यांच्या पहिल्या गुरू. शालेय शिक्षणासाठी १९४३ साली ते पुण्यात आले. १९४९मध्ये ते शालांत परीक्षा उत्तीर्ण झाले. मराठी, कोंकणी, पोर्तुगीज, इंग्रजी आदी भाषा त्यांना अवगत होत्या. पुण्यात नरहरबुवा पाटणकर व यशवंतराव मराठे यांच्याकडे ते गाणे शिकले. तेथून ते बेळगावला गेले व तेथे पेटीवादक विठ्ठलराव कोरगावकरांकडून त्यांनी संगीताचे काही धडे घेतले. पुढे भवन्स कॉलेज, मुंबई येथून संस्कृत विषय घेऊन ते बीए झाले (१९५२).

पुढे अभिषेकी हे मुंबई आकाशवाणी केंद्रात कोंकणी विभागात संगीत संयोजक म्हणून ते रूजू झाले (१९५२). नोकरी करीत असतानाच उस्ताद अझमत हुसेन खाँसाहेब यांच्याकडून गायनाचे मार्गदर्शन घेण्याची संधी त्यांना मिळाली. शास्त्रीय संगीताच्या अभ्यासासाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळाल्यानंतर (१९५९) ज्येष्ठ गायक जगन्नाथबुवा पुरोहित (गुणीदास) यांच्याकडून त्यांना दीर्घकाळ तालीम मिळाली. याबरोबरच अभिषेकी यांनी निवृत्तीबुवा सरनाईक, रत्नाकर पै, अझिझुद्दीन खाँ, मास्टर नवरंग, केसरबाई बांदोडकर इत्यादींकडून मार्गदर्शन घेऊन आपली गायकी अधिक समृद्ध केली. त्यानंतर त्यांनी गुलुभाई जसदनवालांकडून जयपूर घराण्याच्या गायकीची काही वैशिष्ट्ये आत्मसात केली. विविधांगी व्यासंगामुळे आपली अशी स्वतंत्र शैली त्यांनी निर्माण केली. गमकयुक्त स्वरावली, प्रतिमेचा स्वतंत्र आविष्कार, उत्कट, भावनापूर्ण आणि सौंदर्यप्रधान प्रस्तुती, रागभावाला आणि रागस्वरूपाला योग्य स्वराकृती देत केलेले आम आणि अनवट रागांचे गायन आदी गोष्टींमुळे त्यांचे सादरीकरण अविस्मरणीय होत असे.

भावपूर्ण आवाजातील सुंदर व संथ अशी आलापी, मोकळा, स्वच्छ व दीर्घकाळ लावलेला षडज्, अप्रतिम लयकारी, आग्रा गायकीची वैशिष्ट्ये दाखविणारी बोलबनावाची पखरण आणि मग आक्रमक गायकीचा प्रभावी आविष्कार, शब्दांची फेक, भरपूर दमसास व त्याच दमसासाने जाणारी तनाईत ही त्यांच्या ख्यालगायकीची गुणवैशिष्ट्ये होत. मैफलीत ते विशेषकरून अनवट रागांतील (उदा. खोकर, जैत, चारुकेशी, कौंसगंधार, मिश्र शिवरंजनी इत्यादी) नवनव्या बंदिशी सादर करीत असत. 'श्यामरंग' या टोपणनावाने त्यांनी विविध रागात बंदिशी केल्या.

अभिषेकी अगदी सहजपणे नाट्यगीते, अभंग, भावगीत, ठुमरी, दादरा, कजरी, टप्पा आदी उपशास्त्रीय प्रकार रंगवीत. स्पष्ट उच्चारण पद्धतीने विशिष्ट शैलीत ते अभंग म्हणत. त्यांची अभंग गायनाची पद्धती चित्तवेधक होती. त्यांच्या या गायनात वारकरी संप्रदायाप्रमाणे नामसंकीर्तनाची छटा अधिक असे. ते नाट्यगीते शांत, सुंदर व एका विशिष्ट्य लयीत आणि अर्थानुकूल चालीत म्हणत.

नाट्यसंगीत दिग्दर्शक म्हणून त्यांनी केलेली कामगिरी मोलाची असून तीमुळे मराठी नाट्यसंगीताला मनोहारी वळण मिळाले. अभिषेकी यांनी मत्स्यगंधा, ययाती, देवयानी, कट्यार काळजात घुसली, हे बंध रेशमाचे, धाडिला राम तिने का वनी, लेकुरे उदंड जाहली इत्यादी सतरा नाटकांतील पदांना सुरेल चाली लावल्या. हे करताना त्यांनी जुन्या पारंपरिक रागांऐवजी नवीन रागांमध्ये (उदा. गावती, बिहागडा इत्यादी) चाली गुंफल्या आहेत. पद गाणाऱ्या गायकाच्या गळ्याला साजेल अशा रीतीने या चाली दिलेल्या आहेत. वृंदगानाचाही प्रयोग त्यांनी केला होता. त्यात चाळीस गायक-गायिकांनी नोमतोम, धृपद, धमार, मध्यलयीतील ख्याल, ठुमरी, टप्पा, लोकगीते व तराणा हे प्रकार सादर केले होते. त्यांच्या सर्व प्रकारच्या गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या आहेत.

अभिषेकी यांनी लोणावळा या गिरीस्थानात गुरुकुल पद्धतीने सुमारे दहा वर्षे संगीताचे शिक्षण दिले. पुढे पुण्यात स्थायिक झाल्यावरही (१९८७) त्यांनी काही शिष्यांना गुरूकुल पद्धतीने संगीत शिक्षण दिले. शिवाय त्यांनी 'तरंगिणी प्रतिष्ठान' हा विश्वस्त न्यास स्थापण्यात पुढाकार घेतला. होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, वृद्ध कलावंतांना मदत आदींसाठी हा निधी होता. होमी भाभा संशोधन केंद्राकडून 'लोकनाट्यातील संगीत' या विषयावरील संशोधनासाठी त्यांना शिष्यवृत्ती मिळाली होती. त्याद्वारे त्यांनी प्रदेशपरत्वे कुडियाट्टम, मोहिनीआट्टम्, कथकळी, माच, नौटंकी, दशावतार इत्यादी लोकनाट्यातील संगीताचा अभ्यास केला. पं. रविशंकर यांच्याबरोबर ते १९७०मध्ये अमेरिकेस गेले, तेथे सुमारे पाच ते साडेपाच महिने त्यांनी 'किन्नरम' या त्यांच्या संस्थेत विद्यादानाचे कार्य केले.

पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या पत्नीचे नाव विद्यावती असून त्यांना शौनक व मेखला ही दोन अपत्ये आहेत. त्यांचे पुत्र शौनक अभिषेकी व त्यांचे शिष्य प्रभाकर कारेकर, राजा काळे, अजित कडकडे, शुभा मुद्गल, आशा खाडीलकर, सुधाकर देवळे, देवकी पंडित, अरुण आपटे, विनोद डिग्रजकर, हेमंत पेंडसे, मोहन दरेकर, रघुनाथ फडके, विजय कोपरकर, समीर दुबळे, महेश काळे आदी त्यांची गानपरंपरा पुढे नेत आहेत.

पं. जितेंद्र अभिषेकी गोवा कला अकादमीचे सल्लागार व संस्कारभारतीचे सदस्य होते. चिपळूण येथे झालेल्या ७६व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले होते (१९९५). त्यांना अनेक मानसन्मान लाभले. यामध्ये होमी भाभा पुरस्कार (१९६९), नाट्यदर्पण पुरस्कार (१९७८), पद्मश्री सन्मान (१९८८), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९८९), महाराष्ट्र गौरव पुरस्कार (१९९०), गोमंतक मराठी अकादमी पुरस्कार (१९९२), सूरश्री केसरबाई केरकर पुरस्कार (१९९६), मास्टर दीनानाथ स्मृती पुरस्कार (१९९६), स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार (१९९६), बालगंधर्व पुरस्कार (नाट्य परिषद, १९९७) इत्यादींचा समावेश होतो. पुणे येथे ७ नोव्हेंबर १९९८ रोजी अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले.

आजही पं. अभिषेकी यांची गीते आवर्जून गायली जातात. वेगवेगळ्या कार्यक्रमांतून त्यांच्या सुरावटींना उजाळा मिळतो. त्यामुळे अभिषेकीबुवा आपल्यात शरीररूपी हयात नसले तरी आवाजाने आजही जिवंत आहेत.

**-सु. र. देशपांडे**
(मराठी विश्वकोष)

## बदलते तंत्रज्ञान

# तुमचा आयफोन खरा की बनावट? असा तपासा

आपलचा बहुप्रतिक्षित 'आयफोन १८ प्रो' आणि 'आयफोन १८ प्रो मॅक्स' अखेर भारतात अधिकृत विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. जर तुम्हीही हा नवा फ्लॅगशिप आयफोन खरेदी करण्याचा विचार करत असाल, तर फोन हातात पडताच एक महत्त्वाची गोष्ट करायला विसरू नका. लाखो रुपये खर्चून खरेदी केलेला हा फोन खरोखर ओरिजनल आहे की बनावट, याची खात्री सर्वांधी करून घ्या. कारण बाजारात हुबेहूब दिसणाऱ्या क्लोन मॉडेल्सचा सुळसुळाट वाढला आहे.



आयफोनची किंमत लाखोंच्या घरात असल्याने नजरचुकीने बनावट किंवा चुकीचे मॉडेल हातात पडल्यास ग्राहकांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. सध्या बाजारात येणारे बनावट किंवा 'क्लोन' आयफोन इतके हुबेहूब असतात की, पहिल्या नजरेत अस्सल आणि बनावट यांतील फरक ओळखणे कठीण जाते. त्यामुळे फक्त बाह्य डिझाइन, ॲपलचा लोगो किंवा आकर्षक बॉक्स पाहून खात्री बाळगण्याची चूक करू नका. आयफोनची ओरिजनल आहे का हे पाहण्यासाठी फोनचे अंतर्गत सेटिंग्ज, सॉफ्टवेअरचा परफॉर्मन्स, कॅमेऱ्याची गुणवत्ता, सिरी, सिरियल नंबर आणि आयएमईआय क्रमांक तपासून पाहणे गरजेचे आहे. सेकंडहँड आयफोन खरेदी करत असाल, तर त्याच्या सेटिंग्जमध्ये जाऊन फोनचे मूळ पार्ट्स आणि 'सर्व्हिस हिस्ट्री' तपासणे अजिबात विसरू नका.

**सेटिंग्जमध्ये तुमच्या फोनची माहिती तपासा**

फोन चालू केल्यानंतर, सेटिंग्जमध्ये जा. त्यानंतर जनरल आणि मग अबाउटवर टॅप करा. येथे तुम्हाला मॉडेलचे नाव, मॉडेल नंबर, सिरीयल नंबर, IMEI, iOS व्हर्जन आणि स्टोरेज यांसारखी माहिती मिळेल. जर आयफोन नावाखाली फोनमध्ये वेगळी ऑपरेटिंग सिस्टीम किंवा विचित्र इंटरफेस दिसत असेल, तर सावध व्हा. हे फोन बनावट असल्याचे लक्षण असू शकते.

बॉक्स आणि पॅकेजिंगची काळजीपूर्वक तपासणी करा

नवीन आयफोन खरेदी करताना, छपाई, ॲपल ब्रँडिंग आणि पॅकेजिंगच्या गुणवत्तेकडे लक्ष द्या. जर छपाई अस्पष्ट असेल, मजकूर चुकीचा लिहिला असेल किंवा बॉक्सचा पृष्ठभाग खराब झालेला दिसत असेल, तर सावध रहा. बॉक्सवरील माहितीची फोनमधील तपशिलांशी तुलना करा. केवळ चांगल्या पॅकेजिंगमुळे फोन अस्सल आहे असे समजू नका. फोन चालू केल्यानंतरच प्रत्यक्ष तपासणी करा.

# आंतरराष्ट्रीय शांतता दिवस

दरवर्षी २१ सप्टेंबर हा आंतरराष्ट्रीय शांतता दिन म्हणून साजरा केला जातो, ज्याला जागतिक शांतता दिवस म्हणूनही ओळखले जाते. व्यक्ती, समुदाय आणि राष्ट्रांमध्ये शांतता आणि सौहार्दाचा प्रचार आणि जोपासना करणारा हा जगभरातील उत्सव आहे.

संयुक्त राष्ट्रांनी १९८१मध्ये या दिवसाची स्थापना केली आणि जगभरात अनेक कार्यक्रम आणि उपक्रमांनी तो साजरा केला जातो. प्रत्येक वर्षाच्या स्मरणोत्सवाची थीम बदलू शकते, परंतु प्राथमिक उद्देश एकच राहतो. लोकांना संघर्ष निराकरण, हिंसाचार कमी करणे आणि परस्पर समंजसपणा आणि सहकार्याचे वातावरण तयार करण्यासाठी कार्य करण्यास उद्युक्त करणे.

आंतरराष्ट्रीय शांतता दिनानिमित्त शांतता मार्च, मैफिली, संवाद, चर्चा आणि शैक्षणिक कार्यक्रम यासारख्या उपक्रमांमध्ये व्यक्ती आणि संस्था वारंवार सहभागी होतात. हा दिवस समाजांवर युद्ध आणि संघर्षाच्या परिणामांवर चिंतन करण्यासाठी तसेच शांततापूर्ण सहअस्तित्वासाठीच्या समर्पणाची पुष्टी करण्यासाठी एक वेळही प्रदान करतो.

शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक मुत्सद्देगिरीपासून तळागाळातील क्रियाकलापांपर्यंत सर्व स्तरांवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय शांतता दिवस या प्रयत्नांच्या महत्त्वावर जोर देण्याचा प्रयत्न करतो आणि प्रत्येकाला अधिक शांततापूर्ण जगाला हातभार लावणाऱ्या अर्थपूर्ण उपक्रम घेण्यास उद्युक्त करतो.




**निमित्त**

जगभरात शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी आंतरराष्ट्रीय शांतता दिवस साजरा केला जातो. हिंसाचारापेक्षा संवाद आणि समजूतदारपणाने संघर्ष सोडवण्याचे महत्त्व अधोरेखित करणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे. या दिवशी लोक एकत्र येतात आणि ते अधिक शांत जगासाठी कसे योगदान देऊ शकतात यावर विचार करतात. व्यक्ती, समुदाय आणि राष्ट्रांमध्ये सुसंवाद आणि सहकार्य निर्माण करणाऱ्या प्रयत्नांना ओळखण्याची आणि त्यांना पाठिंबा देण्याची ही संधी आहे. हा दिवस आपल्या सर्वांना याची आठवण करून देतो की प्रत्येकासाठी चांगल्या आणि न्याय्य जगासाठी शांतता आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय शांतता दिवस २०२४ची थीम शांततेची संस्कृती जोपासणे आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने जगातील सर्व भागात शांतता प्रस्थापित करण्याची योजना स्वीकारल्याला या वर्षी २५ वर्षे पूर्ण होत आहेत. आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये शांतता निर्माण होईल असे जग निर्माण करण्याची कल्पना आहे. याचा अर्थ दयाळूपणा, समजूतदारपणा आणि इतरांबद्दल आदर यांसारखी मूल्ये शिकवणे आणि आचरणात आणणे. यात हिंसा न करता समस्या सोडवण्यासाठी एकत्र काम करणे आणि विविध संस्कृतींमधील संभाषणांना प्रोत्साहन देणे देखील समाविष्ट आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली तेव्हा १९४५पासून आंतरराष्ट्रीय शांतता दिवस साजरा केला जातो. शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी जगभरातील प्रयत्नांची तातडीची गरज लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र महासभेने २१ सप्टेंबर हा वार्षिक आंतरराष्ट्रीय शांतता दिवस म्हणून स्थापित केला.

या थीमवर लक्ष केंद्रित करून, आंतरराष्ट्रीय शांतता दिवस २०२४चे उद्दिष्ट सर्वत्र लोकांना शांतता आणि सौहार्दाचे समर्थन करणाऱ्या मार्गाने कार्य करण्यास प्रेरित करणे आहे. प्रत्येकजण शांततेने एकत्र राहू शकेल अशा जगाच्या दिशेने काम करण्याचे आवाहन आहे आणि जिथे शांततेची तत्त्वे आपल्या दैनंदिन कृती आणि परस्परसंवादाचा भाग आहेत. (साभार : वेदांतू)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# आपला टूथब्रश बदलत राहणे गरजेचे

दररोज दिवसातून दोन वेळा म्हणजेच सकाळी उठल्यावर आणि रात्री झोपण्यापूर्वी दात घासणे ही आपल्या तोंडाच्या आरोग्यासाठी चांगली सवय आहे, परंतु तुम्ही या कामासाठी योग्य साधन वापरत आहात का? टूथब्रशची परिणामकारकता त्याच्या स्थितीवर अवलंबून असते. डॉ. करिश्मा ॲस्थेटिक्सच्या कॉस्मेटिक दंतचिकित्सक डॉ. निशा ठक्कर यांनी याबाबत सल्ला दिला आहे.



डॉ. ठक्कर यांनी सांगितले की, दातांमधील प्लेक तसेच तुमच्या दात आणि हिरड्या यांच्यामध्ये अडकलेले अन्नाचे कण, त्याज्य घटक बाहेर काढता येतील अशा रीतीने टूथब्रशच्या ब्रिस्टल्सची रचना केली गेलेली असते, परंतु जीर्ण झालेले ब्रिस्टल्स दातांची व्यवस्थित साफसफाई करू शकत नाहीत. मग त्यामुळे दातांमध्ये पोकळी निर्माण होणे आणि हिरड्यांचे आजार आदी त्रास उद्भवण्याचा धोका वाढू शकतो.

टूथब्रश खराब दिसू लागणे : दोन-तीन महिन्यांपूर्वीच तुमचा टूथब्रश तुटला किंवा ब्रिस्टल्स वाकलेले दिसू लागल्यास लगेच नवीन टूथब्रश वापरण्यास सुरुवात करा, असेही डॉक्टरांनी सांगितले आहे.

आजारपणानंतर : आजारपणातून बरे झाल्यानंतर जंतूंचा प्रसार रोखण्यासाठी डॉ. ठक्कर तुम्हाला किंवा कुटुंबातील सदस्यांना टूथब्रश बदलण्याचा सल्ला देतात. असे केल्यास पुन्हा संसर्ग टाळण्यास मदत मिळते.

टूथब्रश नियमितपणे बदलण्याचे फायदे : डॉ. ठक्कर यांनी सांगितले की, टूथब्रश बदलण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून तुम्ही तुमच्या मौखिक आरोग्याचे फायदे घेऊ शकता.

स्वच्छता : ताजे ब्रिस्टल्स प्लेक, अन्नाचे कण काढून टाकण्यासाठी चांगले असतात; ज्यामुळे तोंड स्वच्छ आणि निरोगी होते तसेच दातांमधील प्लेक काढून टाकल्याने दातांमध्ये पोकळी तयार होणे आणि हिरड्यांचे रोग होण्याला प्रतिबंध होतो.

दुर्गंधी दूर होते : तोंड स्वच्छ झाल्यास तोंडाला दुर्गंध येत नाही. अस्वच्छता निर्माण करणारे जीवाणू कमी होतात.

दिनदर्शिकेवर खूण करा : दर दोन-तीन महिन्यांनी तुमचा टूथब्रश बदलला जावा यासाठी तुम्ही दिनदर्शिकेवर टूथब्रश वापरायला सुरुवात केल्याच्या तारखेवर खूण करून ठेवा.

जास्त टूथब्रश खरेदी करा : एकाच वेळी अनेक टूथब्रश खरेदी केल्याने तुम्हाला दोन-तीन महिन्यांतून टूथब्रश एकदा बदलायचे लक्षात राहील.

# रायगडात भक्तिभावाने गौरी-गणपतींचे विसर्जन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात पाच दिवसांच्या ९४५ गणरायांसह २७५ गौराईंचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. ताशे, ढोल-ताशे, टाळ-मृदुंगाच्या गजरात तसेच गुलालाची उधळण करत 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात भक्तांनी लाडक्या बाप्पाला निरोप दिला. यावेळी शहरातील प्रमुख विसर्जन घाटांवर मोठी गर्दी झाली होती.



गणपती विसर्जनासाठी रोहा नगरपालिकेच्या वतीने विसर्जन स्थळांवर विशेष व्यवस्था करण्यात आली होती. दमखाडी घाट, बंदर पकटी घाट, अष्टमी घाट आणि फरशी घाट या चार प्रमुख विसर्जन घाटांची स्वच्छता करून विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

दुपारनंतर घरगुती गणपती विसर्जनासाठी भक्तगण नदीकिनारी येऊ लागले. लेझिम, ढोल-ताशे, टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात गणरायांचे विसर्जन करण्यात आले. महसूल व पोलिस प्रशासनाच्या वतीने विसर्जन मार्गांवर गस्त घालून वाहतूक सुरळीत ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

कुंडलिका नदीकिनारी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी रोह्याचे पोलीस निरीक्षक अभय शेलार यांनी विविध विसर्जन स्थळांची पाहणी केली. तसेच पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ९४५ गणपती व २७५ गौराईंचे विसर्जन करण्यात आले.



**रोहा : गौरी गणपती विसर्जनासाठी कुंडलिका नदीकिनारी येणाऱ्या भाविकांचे रोहा अष्टमी नगर परिषदेच्या वतीने स्वागत करताना मुख्याधिकारी अजयकुमार एडके, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, गटनेते महेंद्र गुजर, नगरसेविका प्रियांका धनावडे, नगरसेवक दिवेश जैन, प्रेषीत बारटक्के, स्वप्नील धनावडे आदी.**

**माणगाव : प्रतिनिधी**

'गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या... मंगलमूर्ती मोरया...'च्या जयघोषात माणगाव शहरासह तालुक्यातील पाच दिवसांच्या घरगुती व सार्वजनिक गणपतींसह गौरींचे शनिवारी (दि. १९) भक्तिमय आणि उत्साही वातावरणात विसर्जन करण्यात आले. गणरायाला भावपूर्ण निरोप देताना गणेशभक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. काळ व गोद नदीच्या पात्रासह विविध तलावांमध्ये विसर्जनाची प्रक्रिया पार पडली. यावेळी माणगाव पोलीस ठाण्याच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

माणगाव तालुक्यात यंदा ५ हजार ४९२ घरगुती आणि दोन सार्वजनिक असे एकूण ५ हजार ४९४ गणपतींची स्थापना करण्यात आली होती. याशिवाय १२ हजार ९८ गौरींची स्थापना करण्यात आली होती. पाच दिवसांच्या उत्सवानंतर शनिवारी दुपारी तीन वाजेपासून सायंकाळपर्यंत



तालुक्यातील विविध विसर्जन स्थळांवर गणेशमूर्ती व गौरींचे विसर्जन सुरू होते. अनेक गणेशभक्तांनी वाहनांमधून गणरायाला विसर्जन स्थळी आणले. पारंपरिक श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचा संगम यावेळी पाहायला मिळाला. माणगाव शहरातील काळ नदी तसेच माणगाव मोर्बा मार्गावरील व माणगाव बमणोली मार्गावरील गोद नदी, परिसरातील गणपती विसर्जन घाटांवर माणगाव नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. गणेशभक्तांना विसर्जनासाठी सहकार्य मिळावे, तसेच विसर्जन प्रक्रिया सुरक्षितपणे पार पडावी यासाठी नगरपंचायतीचे कर्मचारी, स्वयंसेवक आणि पोलीस कर्मचारी घाटांवर तैनात होते. गणेश भक्तांनी नदीच्या पात्रात उतरू नये, यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेत गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी मदतीचा हात दिला.

माणगाव पोलीस ठाण्याच्या वतीनेही विसर्जनस्थळी आवश्यक बंदोबस्त आणि सहकार्य करण्यात आले. माणगाव नगरपंचायतीने गणेश विसर्जनासाठी केलेल्या व्यवस्थेमुळे विसर्जनाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली. शांतता, शिस्त आणि उत्साहपूर्ण वातावरणात पाच दिवसांच्या गणेशोत्सवाची सांगता झाली. गणरायाला निरोप देताना 'पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने माणगाव शहरासह तालुक्यातील विसर्जनस्थळे दुमदुमून गेली.

माणगाव नगरपंचायतीच्या वतीने विसर्जनासाठी येणाऱ्या गणेशभक्तांचे नारळ देऊन स्वागत करण्यात आले. या उपक्रमामुळे विसर्जन स्थळी भक्तीमय वातावरणासोबतच स्वागतशीलतेची भावना दिसून आली. नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांनी आणि स्वयंसेवकांनी गणेशभक्तांना आवश्यक सहकार्य केले. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश गणेश विसर्जन स्थळी माणगाव नगरपंचायतीच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. पर्यावरणपूरक गणेशोत्सव, 'माझी वसुंधरा' आणि 'स्वच्छ सर्वेक्षण' या उपक्रमांच्या अनुषंगाने कृत्रिम विसर्जन तलावाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले.

निर्माल्य नदीपात्रात न टाकता त्यासाठी निश्चित केलेल्या ठिकाणी जमा करण्याचे आवाहन गणेशभक्तांना करण्यात आले. नदी आणि जलस्रोतांचे प्रदूषण टाळण्यासाठी पर्यावरण पूरक विसर्जन पद्धतींचा अवलंब करण्यावर नगरपंचायतीने भर दिला. विसर्जन स्थळी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत गणेशभक्तांना सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने विसर्जन करता यावे यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात आले.

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात गेली सात दिवस आनंदात राहणाऱ्या बाप्पाला आणि पाहुणी म्हणून आलेल्या गौराई मातेला निरोप देण्यात आला. तालुक्यात ६ हजार ११८ सहा दिवसांच्या गणपती बाप्पा तसेच २५९८ गौरींचे वाहत्या पाण्यात विसर्जन करण्यात आले.



तालुक्यातील आठ सार्वजानिक गणेश उत्सव मंडळांच्या गणेश मूर्तींचे देखील विधिवत विसर्जन करण्यात आले. तालुक्यात सर्वत्र उत्साहात साजरा होत असून दीड दिवसांच्या बाप्पा यांना निरोप देण्यात आला होता. तर कर्जत पोलीस ठाणे हद्दीमध्ये १३४१, नेरळ पोलीस ठाणे हद्दीत १२४६ आणि माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीत ११ गौरींचे असे २५९८ गौरींचे पूजन झाले होते. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत सहा दिवसांचे ३८७० बाप्पा बसविण्यात आले होते. नेरळ पोलीस ठाणे येथील हद्दीमधील २१८० गणपती बाप्पांची प्रतिष्ठापना आणि माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ६८ गणपती बाप्पांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती. तसेच नेरळ पोलीस ठाणे हद्दीत तीन सार्वजनिक गणपतीदेखील बसविण्यात आले होते. त्यांचे विसर्जनदेखील गौरींसोबत झाले. त्या सर्वांना वाहत्या पाण्यात विसर्जन करण्यात आले. कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एक, नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तीन व माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका अशा पाच सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांच्या श्री गणेशमूर्तींना देखील निरोप देण्यात आला. यानंतर काही सार्वजनिक गणेशांना निरोप देण्यात येणार आहे.

कर्जत नगरपरिषद हद्दीमधील गणपती बाप्पांना उल्हास नदीमधील वाहत्या पाण्यात विसर्जन करण्यात आले. त्यासाठी कर्जत नगरपरिषदेकडून कर्जत शहरात मुद्रे, दहिवली, महावीर पेठ तसेच शनी मंदिर येथे असलेल्या गणेश घाटांवर आणि गुंडगे तसेच भिसेगाव ग्रामस्थांच्या बाप्पांचेदेखील उल्हास नदीत वाहत्या पाण्यात विसर्जन करण्यात आले. कर्जत नगरपरिषदेकडून सर्व गणेश विसर्जन घाटांवर विजेची रोषणाई आणि बैठक व्यवस्था करण्यात आली होती. नेरळ येथे ग्रामपंचायत हद्दीतील गौरी गणपतींना गणेश घाटावर आयोजित कार्यक्रमात विधिवत निरोप देण्यात आला. त्यात खांडा तसेच मोहाची वाडी येथील ओहळावरदेखील गणेश विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली होती.



**रोहा : शहरातून मिरवणुकीतून महिला डोक्यावरून गौरीला विसर्जनस्थळी घेऊन गेल्या.**

## मुरूड समुद्रकिनारी वाहून आलेल्या २०७ मूर्तींचे श्रीसदस्यांनी केले पुन्हा विसर्जन



**मुरूड : जंजिरा**

मुरूड व मजगाव परिसरात पाच दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन जल्लोषात पार पडले. मात्र, विसर्जनाच्या दुसऱ्याच दिवशी सकाळी माजगाव, राजपुरी समुद्रकिनारी तब्बल २०७ प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती वाहून आल्या. सकाळी समुद्राला ओहोटी लागल्यानंतर किनारी वाहून आलेल्या या मूर्ती डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या २५ श्रीसदस्यांनी पुन्हा खोल समुद्रात बोटीच्या साहाय्याने नेऊन विसर्जित केल्या आणि त्यानंतर संपूर्ण समुद्रकिनारा स्वच्छ केला.

येणाऱ्या पर्यटकांना भग्न मूर्ती दिसू नयेत म्हणून पहाटे सहा वाजताच श्रीसदस्य किनाऱ्यावर दाखल झाले. वाहून आलेल्या मूर्ती एकत्रित करून छोट्या बोटीतून खोल समुद्रात नेऊन पुन्हा विसर्जित करण्यात आल्या. अनेक मुरुडकरांची व श्रीसदस्यांची मागणी आहे की, मुरूड नगरपालिकेने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती विसर्जनासाठी समुद्रकिनारी कृत्रिम तलाव उभारावेत. त्यामुळे भक्तांना स्वतःच्या हाताने आनंदाने मूर्ती विसर्जित करता येईल आणि शाडूच्या मूर्त्या समुद्रात विसर्जित करता येतील. मुरूड परिसरात ५००हून अधिक पीओपी मूर्ती आणल्या जातात. यावर अनेक वेळा बंदी घालूनही मूर्ती येणे बंद झाले नाही, म्हणून कृत्रिम तलाव हा उत्तम पर्याय असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

महाराष्ट्र भूषण डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी श्रीसदस्यांना नेहमी सांगतात, कोकणाला सुंदर समुद्रकिनारा लाभला आहे. त्याला आपल्या घराप्रमाणे स्वच्छ ठेवा. परिसर स्वच्छ तर निरोगी आयुष्य मिळणार, त्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. जो आपले घर व परिसर स्वच्छ ठेवतो तो खरी देशसेवा करतो. सुंदर देशासाठी आपण काही देणे लागतो. चांगल्या मानवाचे प्रमुख लक्षण म्हणजे मनाचा अंतरंग व बाहेरील परिसर स्वच्छ असला पाहिजे.मुरूड तालुक्यात प्लास्टरच्या मूर्तींचे प्रमाण कमी झाले आहे, पण शाडूच्या मूर्तीपेक्षा त्या स्वस्त मिळतात म्हणून अजूनही आणल्या जातात.

पर्यावरणाला घातक असलेल्या या मूर्ती खरेदी करू नका, याबाबत जनजागृती केली जाते; पण त्याचा वापर पूर्णपणे बंद होताना दिसत नाही. डॉ. नानासाहेब प्रतिष्ठानतर्फे श्रीसदस्य अनेक वर्षे प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचे विसर्जन करण्याचे काम करत आहेत, तसेच किनारे स्वच्छ करतात. पण जनजागृती होऊन मतपरिवर्तन होणे गरजेचे आहे. सुशिक्षित लोकांनी पुढे येऊन स्वतः शाडूच्या मूर्ती आणणे गरजेचे आहे.

## पालीतील बारसकर कुटुंबीयांनी घराच्या टेरेसवर केले गणेश विसर्जन

**पाली : प्रतिनिधी**

पालीतील सुजित बारसकर व कुटुंबीयांनी मागील सहा वर्षांपासून जोपासलेली पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची परंपरा यंदाही तितक्याच उत्साहात व निष्ठेने कायम ठेवली आहे. शनिवारी (दि. १९) त्यांनी शाडूच्या मातीपासून साकारलेल्या गणरायाचे विसर्जन पाली येथील आपल्या राहत्या घराच्या टेरेसवर उभारलेल्या कृत्रिम पाण्याच्या टाकीत अत्यंत भक्तिभावाने पार पाडले.



बारसकर कुटुंबाच्या या कौतुकास्पद आणि निसर्गपूरक उपक्रमाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे. सुजित बारसकर हे सुधागड तालुका मराठा समाज सरचिटणीस व भाजप किसान मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष आहेत. या उपक्रमाविषयी माहिती देताना त्यांनी सांगितले की, निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आम्ही दरवर्षी शाडूच्याच मूर्तीची स्थापना करतो आणि आरास व सजावटीसाठीही पूर्णपणे पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करतो.

स्थानिक जलस्रोत दूषित होऊ नयेत आणि जलप्रदूषणाला आळा बसावा या उद्देशाने विसर्जन घरातच करण्याचे आम्ही निश्चित केले. त्यानुसार घराच्या टेरेसवर टाकी तयार करून बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यात आला.विसर्जनानंतर मिळणारी माती आणि जमा झालेले निर्माल्य एकत्र करून त्यात झाड लावले जाणार आहे. यंदा सलग सहाव्या वर्षी पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव यशस्वीरीत्या साजरा केला असून, यापुढेही दरवर्षी अशाच प्रकारे निसर्गाचा सन्मान करत गणेशोत्सव साजरा करण्याचा ठाम निर्धार समृद्धी बारसकर यांनी व्यक्त केला.



**चौक : कोयना वसाहत येथील गौरी गणपतींना साश्रू नयनांनी निरोप देण्यात आला.**



**रसायनी : गणपती आळी, जुना कोळीवाडा बाजारपेठ, गवळी आळी, सोनार आळी परिसरात गौरी-गणपतींना भावपूर्ण निरोप देण्यात आला.**

## सुधागडात डीजेमुक्त विसर्जन सोहळा; प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यात यंदाचा गणेश विसर्जन सोहळा डीजेमुक्त आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनिप्रदूषण तसेच लेझर लाईटच्या वापराबाबत प्रशासनाने घेतलेल्या भूमिकेला गणेश मंडळे आणि नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्यामुळे उत्साह कायम ठेवतानाच ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्याचा संदेश सुधागड तालुक्यातून देण्यात आला.



जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या आदेशाची अंमलबजावणी करत जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पाली पोलिसांनी गणेश मंडळे तसेच नागरिकांमध्ये प्रभावी जनजागृती केली. पाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध गणेश मंडळांशी संपर्क साधून ध्वनिप्रदूषण आणि लेझर लाईटच्या वापराबाबतच्या नियमांची माहिती दिली.

पोलिसांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत पाच दिवसांच्या गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये डीजे वापर टाळण्यात आला. डीजेऐवजी पारंपरिक ढोल-ताशांचा गजर, 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष आणि भक्तिमय वातावरणात गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. उत्सवाचा जल्लोष कायम ठेवतानाच ध्वनिप्रदूषणाबाबतची सामाजिक जबाबदारीही गणेश मंडळांनी जपल्याचे यानिमित्ताने दिसून आले.'उत्सवही साजरा करूया आणि पर्यावरणाचीही काळजी घेऊया' हा सकारात्मक संदेश या उपक्रमातून पुढे आला. प्रशासन, पोलीस यंत्रणा, गणेश मंडळे आणि नागरिक यांच्या समन्वयातून पार पडलेला हा उपक्रम आगामी सार्वजनिक उत्सवांसाठी परिवर्तनाकडे एक पाऊल ठरणारा आहे.

# अनुकूल हवामानामुळे भातशेती तरारली

## मुरूडमध्ये बळीराजाकडून नव्या वाणांची लागवड




**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यामध्ये प्रामुख्याने भात पिकाचे उत्पादन घेतले जात असून सुमारे ३२०० हेक्टर भातक्षेत्र लागवडीखाली आहे. सध्या हवामान अनुकूल असल्याने भातशेती तरारली असून उत्पादनाची सरासरी गाठली जाईल असा अंदाज वर्तवला जात आहे.

भात लागवडीमध्ये मुख्यत्वे जया, सुवर्णा, रूपाली, शुभांगी, चिंटू, वाडा कोलम इत्यादी वाणांचे उत्पादन घेतले जाते. पाणथळ तसेच खार जमिनीत नवीन संशोधित केलेल्या पनवेल १, २,३ या वाणांची लागवड केली जाते. यासिवाय उथळ किंवा उखारू जमिनीमध्ये हळव्या वाणांची लागवड पारंपारिक पद्धतीने केली जाते.

ऊन, पाऊस भातपिकाला अनुकूल असल्याने जया वाण पसवतो आहे. सुवर्णासह इतर जाती आणखी १५ दिवसानंतर पसवतील असे चित्र आहे.

कृषी विभागाकडून भात वाणाचे विविध प्रकार आणून उत्पादकता वाढीसाठी शेतकऱ्यांच्या कार्यशाळा, चर्चासत्रे, क्षेत्रभेटी, परिसंवाद आदी कार्यक्रमांतून जनजागृती करण्याचा प्रयास केला जात असला, तरी पारंपरिक पध्दतीने भातशेती करणाऱ्या बळीराजाने नव्या वाणांचा तसेच नवनवीन लागवड पद्धतीचा अंगीकार केल्याचे पहायला मिळत आहे.

वस्तुतः एसआरटी तंत्राचे अनेक फायदे आहेत. यामध्ये नांगरणी, चिखलणी, लावणी व निंदणी करावी लागत नसल्यामुळे ५० ते ६० टक्के खर्च कमी होतो, पण हे व्यवहारात दिसून येत नाही. भाताचे हळवे वाण ९५ ते ११० दिवस, निमगरवे वाण ११० ते १३० दिवस आणि गरवे वाण १३० ते १४५ दिवस याप्रमाणे भात पीक तयार होण्यासाठीचा कालावधी लागतो.

गेल्या वर्षी चांगला पाऊस आणि योग्य हवामान असल्यामुळे चांगले उत्पादन शेतकऱ्यांना मिळाले होते. या वर्षीसुद्धा सूर्यप्रकाश व हवामान योग्य असल्याने तसेच खोड किड्याचे प्रमाण नसल्याने चांगले उत्पादन मिळण्याचा अंदाज कृषिमित्र उल्हास वारगे यांनी व्यक्त केला आहे.

आतापर्यंत मुरुड तालुक्यात २२७१ मिमी पावसाची नोंद झाली असली तरी गत वर्षीच्या तुलनेत पाऊस कमी पडला आहे. आकडेवारी पाहता २०२३मध्ये ३०५० मिमी, २०२४मध्ये ३१०८ मिमी, २०२५मध्ये २८८४ मिमी, तर यंदा २२७१ मिमी पावसाची नोंद झाली आहे. येत्या एक महिन्यात ७०० मिमी इतका पाऊस पडेल हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# पोलादपूरमध्ये रक्तदान शिबिर; सहभागींचा सन्मान



**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील हनुमाननगर येथील सार्वजनिक गणेशोत्सव काळात हनुमाननगर मित्र मंडळातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी पहिल्यांदाच रक्तदान करणाऱ्या तरुणांमध्ये रक्तदानाच्या अनुभवाबद्दल उत्सुकता दिसून आली.

सुजय प्रतिष्ठान पुणेचे सुरेश सकपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिरास आपली माती आपली माणसं सामाजिक संघटना पोलादपूर संस्थापक व मनसे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष राज पार्टे, ग्रामीण अध्यक्ष हरी पवार, नगरसेवक स्वप्नील भुवड तसेच पोलादपूर सार्वजनिक गणपती उत्सव मंडळाचे अध्यक्ष अमर नगरकर, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष अमित वाडकर यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी शंभरहून अधिकवेळा रक्तदान करणारे पत्रकार संघ मुंबईचे उपाध्यक्ष व पोलादपूरचे ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व रक्तदान प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

हनुमाननगर मित्र मंडळाचे अध्यक्ष अरुण मोहिते, उपाध्यक्ष अतुल पवार, सचिव निहाल पवार, कार्याध्यक्ष साजन पवार यांनी रक्तदान शिबिर व गणेशोत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न केले.

# मुंबई-सावंतवाडी रोड आणखी चार रेल्वेगाड्या

**रोहा : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी रेल्वेने ३९० गणपती विशेष गाड्यांची घोषणा केली आहे. नियमित गाड्यांव्यतिरिक्त यामध्ये मध्य रेल्वेच्या २६२, पश्चिम रेल्वेच्या ६४, कोकण रेल्वेच्या ५८ आणि दक्षिण मध्य रेल्वेच्या सहा विशेष गाड्यांचा समावेश आहे.

मध्य रेल्वेने ८ सप्टेंबरपासून मुंबई ते सावंतवाडी रोडदरम्यान एक नवीन दैनंदिन एक्सप्रेस गाडीही सुरू केली आहे. गणपती विशेष गाड्यांचाच एक भाग म्हणून प्रवाशांची गरज लक्षात घेता मध्य रेल्वे मुंबई ते सावंतवाडी रोडदरम्यान आणखी चार विशेष गाड्या चालवणार आहे.

विशेष गाड्यांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-सावंतवाडी रोड-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष (चार सेवा) गाडी क्रमांक ०१००९ विशेष छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १९ आणि २६ सप्टेंबर रोजी १.४५ वाजता सुटेल आणि सावंतवाडी रोड येथे दुसऱ्या दिवशी ३ वाजता पोहचेल. (दोन सेवा) गाडी क्रमांक ०१०१० विशेष गाडी २० आणि २७ सप्टेंबर रोजी ४.०५ वाजता सावंतवाडी रोड येथून सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे त्याच दिवशी ६.१५ वाजता पोहोचेल. (दोन सेवा).

या गाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, करंजाडी, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलवडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ आणि झाराप हे थांबे देण्यात आले आहेत. आरक्षण सर्व पीआरएस केंद्रावर आणि आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर (www.irctc.co.in) उपलब्ध आहे.

# गणेशोत्सव संस्कृतीचा आणि श्रद्धेचा उत्सव -प्रकाश देसाई

## पालीनगरी गणेशभक्तीत न्हाऊन निघाली; विविध कार्यक्रमांची पर्वणी



**पाली : प्रतिनिधी**

कोकणातील पारंपरिक आणि उत्साहपूर्ण गणेशोत्सव सध्या सुरू आहे. पाली येथील भाजपचे ज्येष्ठ नेते प्रकाश देसाई यांच्या निवासस्थानी गणरायाची मनमोहक मूर्ती भक्तिभावाने विराजमान झाली. गणरायाच्या आगमनाने देसाई यांच्या निवासस्थानी तसेच संपूर्ण पाली बल्लाळनगरीत भक्तिमय आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे.

गणेशोत्सवानिमित्त देसाई यांच्या निवासस्थानी विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सकाळ-संध्याकाळ होणाऱ्या आरती, पूजा-अर्चा आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे परिसर भक्तिरसात न्हाऊन निघत आहे. गणरायाच्या दर्शनासाठी नागरिक, कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि भाविकांचीही उपस्थिती पाहायला मिळाली.

गणरायाच्या प्रतिष्ठापनेनंतर प्रकाश देसाई यांनी कुटुंबीयांसह मनोभावे पूजा आणि आरती केली. यावेळी त्यांनी "गणरायाने सर्वांना सुखी, समाधानी आणि समृद्ध ठेवावे, प्रत्येकाच्या जीवनात आनंद, आरोग्य आणि भरभराट यावी," अशी प्रार्थना बाप्पाच्या चरणी केली.

देसाई यांनी यावेळी बोलताना, गणेशोत्सव हा आपल्या संस्कृतीचा आणि श्रद्धेचा महत्त्वाचा सण आहे. गणरायाच्या आगमनाने प्रत्येकाच्या घरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होते.

बाप्पाच्या चरणी माझी प्रार्थना आहे की, रायगडसह संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला सुख, समृद्धी, उत्तम आरोग्य लाभावे. सर्वांच्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात आणि समाजात एकोपा, बंधुभाव व शांतता कायम राहावी. गणरायाच्या आशीर्वादाने सर्वांच्या जीवनात आनंद नांदो, अशी प्रार्थना केली.

# गणेशोत्सवात पर्यटकांची पावले कुडे लेणीकडे



**तळा : प्रतिनिधी**

सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची धूम सुरू आहे. या काळात तळा तालुक्यातील कुडे लेणीकडे पर्यटकांची पावले वळू लागली आहेत. प्रसिद्ध कुडे लेणीकडे जाण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गावरून इंदापूर येथून तळा हे अंतर १३ किमी असून पुढे तळा ते कुडे लेणी अंतर अंदाजे पाच किमी एवढे असून तारस्तेगावच्या पुढून कुडे लेणीकडे जाता येते. येथून अंदाजे एक किमीचा सिमेंट काँक्रीटचा रस्ता आहे. सुरुवातीला १०० मीटरचा रस्ता कच्चा आहे. कुडे गावच्या मराठी शाळेजवळूनही जाता येते.

गणेशोत्सवात आलेली गावकडील मंडळी आवर्जून कुडे लेणीला भेट देऊन पर्यटनाचा आनंद घेत असतात. येथे १ ते २६ लेण्यांची सविस्तर माहिती क्युआर कोडद्वारे पाहून मिळते. प्रसिध्द अशा या लेणीवर शिल्प आकर्षक व पाहण्यासारखी आहेत. येथे दोन स्तरांवर कोरलेली सव्वीस शैलकृत लेणी व अकरा पाण्याची टाकी आहेत. लेणी क्रमांक १ ते १५ खालील स्तरावर, तर उर्वरित लेणी दुसऱ्या स्तरावर कोरलेली आहेत.

कुडे लेणीत १, ६, ९, १५, २१ लेण्यांमध्ये चैत्यगृहे आहेत. लेणी क्रमांक ६ हे येथील सर्वात मोठे चैत्यगृह आहे. या लेणीच्या प्रवेशद्वाराजवळ दोन्ही बाजूस गजशिल्प कोरलेले असून त्यातील डाव्या बाजूचे शिल्प खंडित झालेले आहे. या लेण्या पाहण्यासाठी मुंबई, पुणे येथील पर्यटक कुडे लेणी पाहून मुरुड जंजिरा व समुद्र किनारी तसेच श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगर येथे जात आहेत. तळा हे मध्यवर्ती ठिकाण असून तळ्याहून मुरूडकडे जाणारा रस्ता व श्रीवर्धनकडे जाणारा रस्ता हा जवळचा आहे. हा रस्ता चांगला असल्याने पर्यटकांना या मार्गाने पर्यटन करण्यास सोपे जात आहे. या रस्त्यामुळे वेळ व खर्चाची बचतही होत असते.

दरम्यान, कुडे लेणी येथे सोई सुविधांची कमतरता भासत आहे. पर्यटकांना येथे राहण्याची व जेवणाची सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या मार्गावर मांदाड परिसरात एखादा रेस्टॉरंट झाल्यास पर्यटकांची अडचण सुटेल व पर्यटन अधिक बहरण्यास साह्यभूत ठरेल असे पर्यटकांतून म्हटले जात आहे. त्याचप्रमाणे लेणीवर पुरातत्व विभागाने पुरातत्व विभागातील नेमणूक केलेल्या कर्माचाऱ्यांची राहण्याच्या दृष्टीने एखादे छोटे अथवा मोठे कार्यालयाची खोली बांधावी व स्वच्छतागृहांची व्यवस्था असावी.



विनोद मेहता, माणगाव



सुभाष पारखे, माणगाव



सचिन गोरेगावकर, माणगाव



संतोष व रामदास दाखीणकर, माणगाव



विलास गोठल, मोर्बे, माणगाव



परशुराम मांदाडकर, खरसई, म्हसळा



वामन पवार, बामणोली, माणगाव



धारिया कुटुंबीय, कुंबळे, महाड

